


# चित्रपदार्पण पुरस्कार सोहळा

**नियमावली**

**■ पात्रता**

■ चित्रपटनिर्मिती प्रक्रियेतील कोणत्याही क्षेत्रात गेल्या एक वर्षाच्या काळात प्रदर्शित झालेल्या मराठी चित्रपटांमधून पदार्पण करणारे कलावंत आणि तंत्रज्ञ या पुरस्कारासाठी पात्र आहेत.

■ चित्रपट गेल्या एक वर्षाच्या काळात किमान एका चित्रपटगृहात प्रदर्शित झालेला असणे आवश्यक आहे. चित्रपटगृहांमधील शोची संख्या आणि दिवसांचे बंधन नाही.

■ केवळ सेन्सॉरचे प्रमाणपत्र मिळालेले, प्रदर्शित न झालेल्या चित्रपटांचा पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही.

■ संगीत अल्बम विभागासाठी गेल्या दोन वर्षात प्रदर्शित झालेल्या अल्बमचा विचार करण्यात येईल,

**■ परिक्षण -**

■ चित्रपटसृष्टीशी संबंधित पत्रकारांची निवड समिती पुरस्कारासाठी नेमण्यात येईल.

■ पत्रकाराव्यतिरिक्त इतर कोणालाही निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही.

■ प्रत्येक विभागासाठी जास्तीत जास्त पाच नामांकने जाहीर करण्यात येतील. एखाद्या विभागामध्ये एकही दखलपात्र पदार्पण अथवा नामांकन नसल्यास तो संपूर्ण विभाग पुरस्कार प्रक्रियेतून बाद कला जाईल.

■ गुणवत्ता हे चित्रपदार्पण पुरस्काराचे निकष असून केवळ पदार्पण नाही.

■ परिक्षण समितीसाठी चित्रपटाचा खास शो आयोजित करण्याची आवश्यकता नाही.

■ परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

**■ प्रवेशअर्ज**

■ पुरस्कारासाठी चित्रपट निर्मात्यांव्यतिरिक्त कलाकार किंवा तंत्रज्ञ वैयक्तिकरित्या प्रवेश अर्ज पाठवू शकतात. प्रवेश अर्जासोबत निर्मात्यांचे पत्र जोडणे आवश्यक नाही. सॅन्सॉर प्रमाणपत्राची गरज नाही.

■ प्रवेश अर्जासोबत चित्रपटाची डिव्हीडी/प्रोमो डिव्हीडी आणि नामांकन मिळालेल्या कलाकारांचे फोटो पाठविणे आवश्यक आहे. प्रोमोमध्ये नामांकन मिळालेल्या कलाकारावर चित्रीत केलेला भाग असणे आवश्यक आहे.

■ चित्रपटाची डिव्हीडी/प्रोमो डिव्हीडी आणि नामांकने मिळालेल्या कलाकारांचे फोटो प्रवेश अर्जासह १०/२४ ई पश्चिमा नगरी, सिटी प्राईड थिएटरजवळ, कोथरुड पुणे ४११०२९ या पत्त्यावर पाठवावा.

■ कागदपत्रांची पूर्तता करु न शकणाऱ्या नियमबाह्य प्रवेशिका बाद ठरविण्यात येतील, यासाठी संयोजन समितीतर्फे कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

■ अर्जदाराने अर्ज, निर्मात्यांचे पत्र आणि नामांकन मिळालेल्या कलाकारांचे फोटो yogeshpbaraskar@gmail.com या ई मेलवर पाठविले तरी चालतील. चित्रपटाच्या डिव्हीडी/प्रोमो डिव्हीडी पोस्ट किंवा कुरिअरने पाठवाव्यात.